# महाराष्ट्र शासन

क्र.मअसे/२०१३/१०/११३१
दूरध्वनी: २६६७७५५५
फॅक्स : २६६६०२८७
Email : supdt@mahafireservice.gov.in
Website: www.mahafireservice.gov.in

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय,**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रुझ-पूर्व, मुंबई-४०० ०९८.
दिनांक : २५ जुलै,२०१३.

## परिपत्रक

विषय: Portable Inflatable Emergency Lighting System चा वापर अग्निशमन सेवेमध्ये करण्याबाबत.

कोणत्याही आपत्कालिन परिस्थीतीत, मुख्यत्वे करुन रात्रीच्या वेळी अंधारात आग विझविण्याचे कार्य करताना अथवा बचाव कार्य करताना विद्युत पुरवठा खंडीत होतो किंवा नियमीत विद्युत पुरवठा खंडीत करावा लागतो. याचा विचार करुन Portable Inflatable Emergency Lighting System ही यंत्रणा खासदार निधी, जिल्हास्तर अग्निसुरक्षा अभियान, १३ व्या वित्त आयोगातून मिळणा-या अनुदानातून खरेदी करण्यासाठी ब-याच महागनरपालिका/नगरपरिषदा/विशेष नियोजन प्राधिकरणांच्या अग्निशमन विभागांकडून तांत्रिक सल्ला या संचालनालयाकडे मागण्यात येतो.

०२. या संदर्भात कळविण्यात येते की, Portable Inflatable Emergency Lighting System चा संच आपत्कालिन प्रसंगी किंवा आगीच्या दुर्घटनेच्या ठिकाणी किंवा बचाव कार्य करताना प्रकाश देण्यासाठी (Lighting System) अत्यंत प्रभावी ठरते. अग्निशमन वाहने, तसेच बचाव कार्य करणा-या वाहनांबरोबर हा संच उपलब्ध असल्यास आपत्कालिन प्रसंगी प्रकाश उपलब्ध करणे सहज शक्य होते. कोणत्याही आणीबाणीच्या प्रसंगी या यंत्रणेचा उपयोग वीज तयार करण्यासाठी जनित्र म्हणून करणे सुध्दा शक्य आहे. अग्निशमन विभागाकडे ही यंत्रणा राज्यातील सर्व अग्निशमन केंद्रांकरीता व वाहनांकरीता उपयुक्त ठरेल.

०२. **केंद्र शासनाच्या डि.जी.एस. अॅण्ड डी. च्या दरकरारामध्ये सदर यंत्रणा अंतर्भूत असून** नागरी स्थानिक स्वराज्य संस्था अथवा विशेष नियोजन प्राधिकरणे यांनी स्वतःच्या निधीतून किंवा खासदार निधी, जिल्हा नियोजन विकास परिषद निधी, जिल्हास्तर अग्निसुरक्षा अभियान, १३ व्या वित्त आयोगातून मिळणा-या अनुदानातून हे उपकरण घेण्यात यावे, असे या संचालनालयाचे निर्देश आहेत.

25/7/13

**(एम.व्ही.देशमुख)**
संचालक,
महाराष्ट्र अग्निशमन सेवा

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस सादर/अग्रेषित :-

१) मा.प्रधान सचिव-१, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२) मा.प्रधान सचिव-२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी, मुंबई ४०० ०९३.
४) आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई ४०० ०३०.
५) सर्व विभागीय आयुक्त.
६) सर्व जिल्हाधिकारी.
७) आयुक्त, सर्व महानगरपालिका.
८) मुख्याधिकारी सर्व नगर परिषदा / नगर पंचायती.
९) सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरणे यांचे मुख्य अग्निशमन अधिकारी व प्रभारी अग्निशमन अधिकारी.
१०) कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग (नवि-२०), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

10-Office order